**शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून तंत्र शिक्षण संचालनालयांतर्गत कार्यरत अशासकीय विनाअनुदानित तंत्रनिकेतनातील/ तंत्रसंस्थांतील अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अखत्यारितील अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश क्षमतेत बदल व नवीन अभ्यासक्रमांना मान्यता व सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमांना मुदतवाढ देण्याबाबत**

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. मान्यता २००७/(११२/०७)/तांशि-६
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२
दिनांक:-२२ ऑगस्ट, २००७

संदर्भ:- १) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. ३३८२/११८३६/(१९०)/तांशि-१अ, दिनांक २१ मे, १९८३
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. मान्यता २००६/(१८७/०६)/तांशि-६, दिनांक १९ मे, २००७
३) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. १०/एनजीपी/पदविका प्रस्ताव/२००७/२०७, दि. २ ऑगस्ट २००७
४) विभागाचे पत्र क्र. मान्यता २००६/(१८७/०६)भाग-२/तांशि-६, दिनांक १७ आगस्ट, २००७
५) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचें पत्र क्र. २२-२६१७/२००७, दि. १७.०८.२००७

**शासन निर्णय:-** सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षासाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अखत्यारितील पदविका अभ्यासक्रम (अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र) राबविणा-या संस्थेतील प्रवेश क्षमतेत बदल, नवीन अभ्यासक्रमांना मान्यता व सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमांना मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मार्गदर्शक तत्वानुसार यासाठी संदर्भ क्र.- २ अन्वये राज्यस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली होती. सदरहू समितीच्या शिफारशी संचालनालयाने संदर्भ क्र.- ३ अन्वये सादर केल्या होत्या व तदनुषंगाने या शिफारशी संदर्भ क्र.-४ अन्वये अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आल्या होत्या. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने उपरोक्त संदर्भ-५ मधिल पत्रान्वये मान्यता दिल्याप्रमाणे **श्रध्दा रुरल मेडिकल सोशल वेलफेयर ॲण्ड एज्युकेशनल ट्रस्ट द्वारा संचलित सहकार महर्षी किसनराव वराळ पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर-४१४३०६** या संस्थेत निम्न निर्देशित केल्याप्रमाणे नविन अभ्यासक्रम सुरु करण्यास शैक्षणिक वर्ष-२००७-०८ पासून पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून शासन मान्यता देत आहे.

१) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडून यापुढे विहित करण्यात येणा-या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संबंधित संस्थेस करारनामा करावा लागेल.
२) उपरोक्त संदर्भ-५ मध्ये नमूद केलेल्या अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या पत्रात व त्या पत्रासोबतच्या प्रपत्रामध्ये नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून सदर मान्यता देण्यात येत आहे.
३) सदर पदविका अभ्यासक्रमासाठी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची संलग्नता आवश्यक राहील. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या पत्रान्वये मंडळाने ज्या संस्थांची शिफारस शासनास केली नसेल त्या संस्थांनी विहित पध्दतीनुसार तंत्र शिक्षण मंडळाकडे अर्ज करुन याबाबतची आवश्यक कार्यवाही पूर्ण करावी.

| संस्थेचे नाव | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता | मान्यता कालावधी |
|---|---|---|---|
| श्रध्दा रुरल मेडिकल सोशल वेलफेयर ॲण्ड एज्युकेशनल ट्रस्ट द्वारा संचलित सहकार महर्षी किसनराव वराळ पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर- ४१४३०६ | औषध निर्माण शास्त्र | ६० | २००७-२००८ |

२. सदर शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे मंजूर प्रवेश क्षमतेसह सदर संस्थेस यावर्षी पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेत सामावून घेण्याची कार्यवाही संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी करावी व तदनुषंगाने संस्थांची अद्ययावत यादी तयार करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( अ. गो. खडपकर )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये
३) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, बांद्रे (पूर्व), मुंबई
४) संबंधित संस्था

प्रत माहितीसाठी

१) अतिरिक्त सचिव (तांत्रिक) भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, इंदिरा गांधी स्पोर्टस कॉम्पलेक्स, आय. पी. इस्टेट, नवी दिल्ली ११०००२
२) सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक) भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल ॲश्युरन्स बिल्डिंग, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०
3) निवड नस्ती/तांशि-६